| MHBU190010992023 | नियमित दरखास्त ४/२००९<br>शिवाजी मुरकुट विरूध्द शंकर मुरकूट<br>निशाणी क्रमांक १४६ खाली |
|---|---|

<u>निशाणी क्रमांक १४६ खालील आदेश</u>

०१. प्रस्तुतचा अर्ज हरकतदार यांनी वाद जमीन मोजणी बाबत दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करीता संबंधित कार्यालयास दिलेल्या आदेशाची पुर्तता करण्यासंबंधी आदेशात तुर्तातुर्त स्थगीती देणेसाठी सादर केला आहे.

०२. हरकतदार यांचे थोडक्यात कथन असे की, सदर प्रकरणात हरकतदार यांच्यातर्फे नि. क्र. १२५ व १२८ वर हरकत अर्ज व दरखास्त करीता स्थगीती साठी अर्ज दिला होता. न्यायालयाने नि. क्र. १२५ व नि. क्र. १२८ वर दि. १६/०२/२०२६ रोजी निकाली काढले. सदर आदेशाबाबत हरकतदार यांना सुचित केले नाही. दि. १६/०२/२०२६ रोजीच्या आदेशाविरूध्द हरकतदारांना वरील न्यायालयात दाद मागणे आहे. सदर आदेशाबाबत २ दिवसांपुर्वी माहिती मिळाल्याने नकलेसाठी अर्ज देखील दिला अश्या परिस्थितीत वरील प्रकरणात पुढील कार्यवाही तुर्तास स्थगीती होणे आवश्यक आहे. तरी पुढील तारीख प्रकरणात एक महिन्याची देण्यात यावी, त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

०३. गैरहरकतदार यांचे विधीज्ञ श्री. जी. पी. भाला यांनी नि. क्र. १४६ वर त्यांचे म्हणणे दाखल केले, त्यांनी अर्जास तिव्र विरोध केला, पुढे त्यांनी असे नमूद केले की, सदर अर्ज प्रतिपालनीय नाही. जे. डी. चा दरखास्त स्थगीतीचा अर्ज नामंजूर झालेला आहे. सदर प्रकरण जुने आहे. जे. डी. हे काहीनाकाही अर्ज करत प्रकरण लांबवित आहेत. तरी सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा. जे. डी. यांनी आदेशाची माहिती नसल्याबाबत प्रकरण लांबणीवर

टाकण्याच्या उद्देशाने हेतुपुरस्सर अर्ज सादर केला आहे. त्यामुळे त्यांनी असे नमूद केले की, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले, दोन्ही विधीज्ञांचे म्हणणे ऐकले, असे दिसून येते की, धनको यांनी ऋणको यांच्या विरूध्द मौजे ढोरवी गट नं. ९६ मधील उत्तरेकडील ०३ हे. ९१ आर या जमीनीचा ताबा मिळण्यासाठी सदरची दरखास्त दाखल केली आहे. सदर दरखास्त हि सन २००९ ची आहे. सदर प्रकरणामध्ये हरकतदार यांचा हरकत अर्ज नि. क्र. १२५ व नि. क्र. १२८ हा गुणवत्तेच्या आधारावर नामंजूर करण्यात आला आहे. सदर हरकतदाराचा हरकत अर्ज न्यायालयाने नामंजूर केला. परंतु हरकतदार यांनी परत नि. क्र. १४६ अंर्तगत हुकूमनाम्यास स्थगीती मिळण्यासाठी सादर केला आहे. तसेच न्यायालयाने नि. क्र. ११६, ११८ व ११९ प्रमाणे धनको यांना ताबेबाबत आदेश पारीत केला आहे. त्यामुळे प्रस्तुत हरकतदाराचा अर्ज हा प्रतिपालनीय नाही. त्यामुळे हरकतदार यांना एक महिना ची तारीख वाढवून देता येणार नाही. तसेच धनको यांच्या विधीज्ञांनी नमूद केले की, सदर दरखास्त हि लांबणीवर टाकण्याच्या उद्देशाने हरकतदार अर्ज करत आहेत. न्यायालयाने हकरतदार यांचा अर्ज नि. क्र. १२५ व नि. क्र. १२८ हा गुणवत्तेच्या आधारे निकाली काढल्यामुळे व सदर दरखास्त हि अत्यंत जुनी असल्याने हरकतदार यांना एक महिन्याचा कालावधी देता येणार नाही, त्यामुळे वरील चर्चेअंती खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१. नि. क्र. १४६ हा नामंजूर करण्यात येतो.

PRAFUL BHARAT TELGOTE
Digitally signed by PRAFUL BHARAT TELGOTE
Date: 2026.04.21 15:47:56 +0530

दिनांक : २१/०४/२०२६
स्थळ : सिंदखेड राजा

(प्रफुल बी. तेलगोटे)
सह-दिवाणी न्यायाधीश, क-स्तर,
सिंदखेड राजा